मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २७५ * सातारा * सातारा मंगळवार दि. १८ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# पश्चिम बंगालमध्ये भीषण रेल्वे अपघात





## कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीची धडक

## पाच ठार तर २५ गंभीर

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये एक मोठा रेल्वे अपघात झाला आहे. येथे रुळावर उभ्या असलेल्या कांचनजंगा एक्सप्रेसला मागून भरधाव वेगाने येणाऱ्या मालगाडीने जोरदार धडक दिली या अपघातात आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला आहे. एनजेपीहून सियालदहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्स्प्रेसला सिलीगुडी ओलांडल्यानंतर रंगपनीर स्टेशनजवळ अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातात रेल्वेच्या मागील बाजूच्या तीन बोगींचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात आतापर्यंत ५ प्रवाशांचा मृत्यू झाला असून २५ जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातात मालगाडीच्या लोको पायलटचाही मृत्यू झाला आहे.

रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात दोन प्रवासी बोगी आणि एका पार्सल बोगीचे नुकसान झाले आहे. या अपघातात अनेक जण जखमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळावरील सर्व सरकारी आणि खासगी रुग्णालयांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दार्जिलिंग पोलिसांचे अतिरिक्त एसपी अभिषेक रॉय म्हणाले, या अपघातात पाच प्रवाशांचा मृत्यू झाला असून २०-२५ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. मालगाडी कांचनजंगा एक्स्प्रेसला धडकल्याने हा अपघात झाला.

रेल्वे, **NDRF** आणि **SDRF** जवळच्या समन्वयाने काम करत आहेत.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या अपघातावर शोक व्यक्त केला असून **NFR** परिसरात दुर्दैवी अपघात झाल्याचे सांगितले. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. रेल्वे, **NDRF** आणि **SDRF** जवळच्या समन्वयाने काम करत आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. या घटनेवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ट्विट केले आहे. ममता यांनी लिहिले आहे की, दार्जिलिंग जिल्ह्यातील फणसीडेवा भागात झालेल्या एका भीषण रेल्वे अपघाताबाबत समजल्यावर तिला धक्का बसला आहे. तपशिलांची प्रतीक्षा असली तरी, कांचनजंगा एक्स्प्रेसची मालगाडीशी टक्कर झाल्याचे वृत्त आहे. बचाव आणि वैद्यकीय मदतीसाठी डीएम, एसपी, डॉक्टर, रुग्णवाहिका आणि आपत्ती पथके घटनास्थळी पाठवण्यात आली आहेत. युद्धपातळीवर कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



या अपघातात १० ते १५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे, तर डझनभर लोक जखमी झाल्याची माहिती आहे. कटिहार रेल्वे विभागाचे डीआरएम यांनी फोनवर अपघाताची पुष्टी करताना सांगितले की, एनजीपी आणि कटिहार येथून बचाव पथके रवाना करण्यात आली आहेत. अपघातानंतर किशनगंज गुवाहाटी रेल्वे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे.

## चाईबासा येथे चार नक्षलवाद्यांचा खात्मा

**चाईबासा :-** कोल्हाणच्या जंगलात नक्षलवाद्यांविरोधात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पश्चिम सिंगभूम जिल्ह्यातील गुवा पोलीस स्टेशन हद्दीतील जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सोमवारी सकाळी सुरू झालेल्या चकमकीत नक्षलवाद्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या चकमकीत सुरक्षा दलांनी ४ नक्षलवाद्यांचा खात्मा केला.

चकमकीच्या ठिकाणाहून नक्षलवाद्यांच्या मृतदेहांसह शस्त्रे आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलांनी परिसरात शोध मोहीम सुरू केली होती. दरम्यान, घातपातात बसलेल्या नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला.

प्रत्युत्तर देताना जवानांनी चार नक्षलवाद्यांना ठार केले. सध्या परिसरात शोधमोहीम सुरू आहे. काही नक्षलवाद्यांना गोळ्या लागल्याचीही माहिती आहे.

## महाराष्ट्रात सर्वत्र मोफत उपचार? गरीब व गरजू रुग्णांना मिळणार लाभ

**मुंबई :** महाराष्ट्रात राहणाऱ्या गरीब आणि दुर्बल घटकांसाठी आनंदाची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रातील गरीब आणि दुर्बल घटकांसाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत त्यांना उत्तम आरोग्य सेवा मिळू शकणार आहे. या योजनेंतर्गत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये नागरिकांना मोफत उपचार दिले जात आहेत. शिंदे सरकारच्या या योजनेचा गरीब व गरजू रुग्णांना लाभ मिळावा, हा उद्देश आहे. त्यामुळे त्यांच्या उपचारावर खर्च होणारा पैसाही वाचणार आहे.

मुलींच्या लग्नासाठी सरकार देणार पैसे




महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री म्हणाले की, आता राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सर्व प्रकारचे उपचार मोफत केले जात आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत २,४१८ संस्था आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, महिला रुग्णालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, संदर्भ सेवा रुग्णालय आणि कर्करोग रुग्णालय येथे नागरिकांना मोफत उपचार मिळणार आहेत.

सध्या या सुविधांमध्ये दरवर्षी २.५५ कोटी नागरिक उपचार घेतात. मोफत आरोग्य सेवा देऊन ही संख्या वाढवण्याचे महाराष्ट्र सरकारचे उद्दिष्ट आहे. गेल्या वर्षी जूनमध्येच महाराष्ट्र सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवण्याची घोषणा केली होती. कव्हरेज मर्यादा २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. आता या योजनेचा लाभ राज्यातील सर्व नागरिकांना मिळणार आहे.

यापूर्वी या योजनेचा लाभ पिवळा शिधापत्रिकाधारक, अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारक, अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक व केशरी शिधापत्रिका धारकांना मिळत होता.

संकटाचा सामना करणाऱ्या १४ जिल्ह्यांतील पांढरे शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांचाही समावेश करण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने, आता सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्य सेवांचा व्यापक प्रवेश सुनिश्चित होणार आहे.

## लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाकडे गांभीर्याने पाहावे; पंकजा मुंडेंचा रोख कोणाकडे?

**जालना :** अंतरवली सराटीच्या वेशीवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांचे गेल्या चार दिवसापासून आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजाला धक्का लागणार नाही याची लेखी हमी सरकारने द्यावी या मागणीसाठी हे आमरण उपोषण सुरू आहे. दरम्यान लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांची प्रकृती खालावत चालली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी ट्वीट केले आहे. तसेच समान न्यायाची अपेक्षा मायबाप सरकारकडून असते. हाके यांच्या उपोषणाकडे गांभीर्याने पाहावे, अशी मागणी पंकजा मुंडे यांनी सरकारकडे केले आहे.



पंकजा मुंडे म्हणाल्या, लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी उपोषणाला बसले आहेत. पाणी देखील सोडले आहे. पाणी सोडल्यामुळे त्यांची प्रकृती खालावत आहे. शासनाची भूमिका माय-बापाची असावी. सर्व वर्गांना, सर्व आंदोलनांना सारखीच वागणूक मिळावी. समान न्यायाची अपेक्षा मायबाप सरकारकडून असते. यांच्या उपोषणाकडे गांभीर्याने पाहावे.

**लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे. राज्य सरकारचं शिष्टमंडळ हाकेंच्या भेटीसाठी जालना -वडीगोद्री येथे दाखल झाले आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही याचं लेखी आश्वासन देण्याची हाकेंची मागणी आहे. मंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, माजी केंद्रीयमंत्री भागवत कराड दाखल झाले आहेत.

**लक्ष्मण हाके यांच्या मागण्या काय?**

ओबीसी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मूळ आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करू नये. तसे लेखी आश्वासन मुख्यमंत्री महोदयाकडून मिळाले पाहिजे.

कुणबीच्या लाखो बोगस नोंदीची त्वरित दखल घेवून त्या रद्द करण्यात याव्यात.

ओबीसीच्या आर्थिक विकास महामंडळाना आर्थिक तरतूद व्हावी.

ओबीसीच्या वसतिगृहाची प्रत्येक जिल्हात योजना कार्यान्वित व्हावी.

ओबीसीची जातनिहाय जनगणना व्हावी

लक्ष्मण हाके काय म्हणाले?

लक्ष्मण हाके म्हणाले, आमची एकच विनंती एका बाजूला शासन आणि सर्वच पक्षाचे प्रमुख ओबीसीला धक्का लागणार नाही म्हणत आहेत. त्याचवेळी मनोज जरांगे आम्ही ओबीसी मराठा समाज घुसवला असं म्हणत आहेत. त्यामुळे ओबीसींच्या मनामध्ये चिंतेचे वातावरण ओबीसींना डावलल्याची भावना आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही तर कसा लागत नाही? आणि आत्ताच्या ज्या कुणबी नोंदी दिल्या जात आहेत.

शासनाच्या संरक्षणमध्ये खाडाखाडी करून कुणबी नोंदी चे प्रमाणपत्र दिले जात आहेत, याच लेखी उत्तर सरकार ने द्यावे. आम्ही कोणत्याही जातीचा द्वेष करत नाही, आमचे शिष्टमंडळ उद्या मुंबईला जाईल, पण ओबीसींना कसा धक्का लागत नाही हे सरकारने सांगावे, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २९ जूनपासून सुरू होणार



**सातारा :** लाखो वारकऱ्यांचे लक्ष लागलेला संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २९ जूनपासून सुरू होणार आहे. हा सोहळा दि. ६ जुलै रोजी सातारा जिल्ह्यात आगमन करणार आहे. यावर्षी सोहळ्याचे जिल्ह्यात पाच मुक्काम राहणार आहेत. तर ११ जुलै रोजी सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करुन पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे.

आळंदी येथून दि. २९ जून रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सुरू होणार आहे. पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातन प्रस्थान करत सोहळा पंढरपूरला जातो. दि. ६ जुलै रोजी पालखी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात प्रवेश करणार आहे. रात्रीचा मुक्काम लोणंद येथे असणार आहे. तर दि. ७ रोजीही लोणंद येथेच मुक्काम असेल. तर दि. ८ जुलै रोजी सकाळचा विसावा व दुपारचे भोजन लोणंद येथे घेऊन पालखी लोणंद येथून मार्गस्थ होईल.

दुपारचा विसावा चांदोबाचा लिंब येथे होईल. तर मुक्काम तरडगाव, ता. फलटण येथे होणार आहे. ९ जुलै रोजी सकाळी तरडगाव येथून पालखीचे प्रस्थान होईल.

त्यानंतर सकाळचा विसावा दत्तमंदिर काळज, दुपारचे भोजन निंभोरे ओढा आणि विसावा वडजल येथे राहील. त्यानंतर रात्रीचा मुक्काम फलटण येथे राहणार आहे.

दि. १० जुलै रोजी सकाळी फलटण येथून पालखीचे प्रस्थान होईल. सकाळचा विसावा विडणी, दुपारचे भोजन पिंपरद, विसावा निंबळक फाटा येथे असेल. तर रात्रीचा मुक्काम बरड येथे असणार आहे. दि. ११ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यातील प्रवेशासाठी बरड येथून पालखीचे प्रस्थान होईल. त्यानंतर सकाळचा विसावा साधबुवाचा ओढा तर दुपारचे भोजन धर्मपुरी पाटबंधारे बंगला कॅनॉलजवळ होईल. त्यानंतर पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करेल. सोलापूरमधील रात्रीचा मुक्काम हा माळशिरस तालुक्यातील नातेपुते येथे राहणार आहे.

# संपादकीय

## अशी असावी शाळा

अशी असावी शाळा,
घडवी विद्यार्थ्यांचा भक्कम पाया
संस्काराची शिदोरी देऊन
देई उज्वल भविष्य देशाला

शाळा या एका शब्दापाशी खरं तर एक अनामिक ओढ आहे. जिव्हाळा, आपुलकी, आदर आहे. आपलं एक अख्खं विश्वच या एका ठिकाणी सामावलेलं असतं आणि म्हणूनच शाळा आपल्याला पुढील आयुष्यात या खुल्या जगात खंबीरपणे नेतृत्व करण्याची, सुखी क्षणांचा आनंद घेण्याची, प्रामाणिकपणे जगण्याची, आत्मविश्वासाने समाजात वावरण्याची ताकद देते. नेहमीच समाजाच्या जडणघडणीत शाळेचाच मोठा हातभार असतो. म्हणूनच जिथे देशाच्या भावी नागरिकाचा पाया रचला जातो, अशा शाळा दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत शाळा, दर्जेदार शिक्षण, शाळांची माध्यमे, शाळांचे बोर्ड (सी.बी.एस.सी., आय.सी.एस.सी., स्टेट बोर्ड) शाळांमधील भौतिक सुविधा यांवर बराच उहापोह सुरू आहे आणि त्यांच्यात स्पर्धाही सुरू आहे. अनेक शाळांचा लौकिक पाहायला व ऐकायला मिळत आहे. तेव्हा या सर्व मिश्रणात शाळा मराठी असेल तर ती कशी असावी अशी कल्पना केली. स्वत:शी सुसंवाद साधला आणि आपोआप अनेक प्रश्नांची उत्तरे उलगडू लागली. कल्पनेत अगदी सुगरणीच्या खोप्याची एक एक वीण घट्ट बसावी आणि निसर्गाची किमया साकारावी किंबहुना, तसेच ङ्गकशी असावी मराठी शाळा माझ्या कल्पनेतफअशी अबोलपणे लेखणी फिरू लागली.

खरं पाहाता, समाजातील बराच पालकवर्ग भौतिक सुविधांची रेलचेल असलेल्या इतर माध्यमांच्या शाळांकडे वळत आहे. म्हणजे खूप पैसे भरले की, पाल्याच्या शिक्षणाबाबत आपण निश्चिंत अशी काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा शाळांमधून २०-२५ पुस्तकांचे ओझे घेऊन लहान मुले ए.सी. वर्गात बसतात. शाळेतून नाश्त्यापासून जेवणापर्यंत खाद्यपदार्थ पुरवले जातात. प्रोजेक्टर, कॉम्प्युटरवर सर्व शिक्षण त्यामुळे मुले विद्यार्थी-शिक्षक आंतरक्रिया, सुसंवाद कमी, मित्र-मैत्रिणींबरोबर विचारांची देवाणघेवाण नाही. सहकार्य भावना नाही त्यामुळे मुले एकलकोंडी व परावलंबी होत आहेत. या शिक्षणप्रक्रियेतून यंत्रवत मेंदू निर्माण होताना दिसत आहेत. केवळ साचेबद्ध ज्ञान घेऊन सांख्यिकी गुण मिळवलेले विद्यार्थी पाहिले की, लक्षात येते की, या पिढीतील संवेदनशीलता, सुसंस्कृतपणा, स्वावलंबन, संस्कार असे आणखी बरेचसे गुण कुठे हरवून गेलेत? ही बाब खरं तर खूपच गंभीर आहे. त्यामुळे समाज कोणत्या दिशेने जात आहे, असा प्रश्नच आहे. भौतिक सुविधा विद्यार्थ्यांना मिळणे गरजेचे आहेच. परंतु असे ठासून सांगावेसे वाटते की, जर शाळा मराठी असेल तर ती अशी असावी की जी विद्यार्थ्याला ज्ञानाच्या भांडारासोबत सुसंस्कारांची भलीमोठी शिदोरी देऊन विविध सकारात्मक अनुभवाचा ठेवा देत एक सक्षम नागरिक देशाच्या हाती सुपूर्त करेल. संस्कारक्षम शिक्षण ही बाब विशेष नमूद करावीशी वाटते आणि मराठी माध्यमांच्या शाळेतून ही गोष्ट नक्कीच साध्य होऊ शकते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत संस्कारक्षम, आत्मविश्वासपूर्ण शिक्षण देण्याचे शिवधनुष्य पेलणारी मराठी शाळा असावी. खरं तर वाचन-लेखन शिकवण्याचे काम सर्वच शाळांमधून होत असते. मात्र ज्ञानरचनापद्धतीवर प्रत्यक्ष अनुभूती, कृती-उपक्रम-कार्यक्रम यांवर आधारित हसतखेळत, आनंददायी शिक्षण देणारी शाळा असावी.

शाळा जरी मराठी असली तरी तेथे भाषेचा भेदभाव नसावा. इंग्लिश, हिंदी इतर विषयाचे ज्ञानही तेथे अभ्यासपूर्णच दिले जावे. प्रत्येक भाषा शिक्षणाला तिथे न्याय दिला जावा. विद्यार्थ्यांकडे प्रत्येक विषयाचे भाषा शिक्षणाचे भरपूर ज्ञान असावे. त्याकरिता मराठी भाषेइतकाच आनंद मुलांना इतर भाषांचे शिक्षण घेतानाही वाटावा. मराठी शाळेतील शिक्षक ध्येयवेडे असावेत जे साचेबद्ध शिक्षणाच्या बंधनात न अडकता शिक्षणाच्या विविध वाटा चोखाळताना दिसावेत. शिक्षक-मुख्याध्यापक-पालक-कर्मचारी यांमध्ये सौहार्दाचे नाते असावे. शिक्षणात होणारे बदल स्वीकारून स्वत:ला अद्ययावत ठेवणारे, तसेच तंत्रस्नेही शिक्षक व मुख्याध्यापक असावेत. आणि मग याच ऋणानुबंधाच्या सावलीत देशाचे वटवृक्ष वाढावेत व बहरावेत. याक्षणी प्रार्थनेच्या ओळी स्मरतात,

तू बुद्धी दे, तू तेज दे,
नवचेतना विश्वास दे,
जे सत्य, सुंदर सर्वथा,
आजन्म त्याचा ध्यास दे

अशा अनेक मराठी शाळांमधून तो विश्वास, बुद्धी, नवचेतना व सत्याचा ध्यास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावा.

शाळेचे माध्यम मराठी असले तरीही तेथे बंधुतेचे, समतेचे, संवादाचे, सहकार्याचे बाळकडू दिले जावे. तेथे भारतातील विविध धर्म जाती संस्कृतीची परिभाषा मुलांना कळावी; एकोपा, बंधुतेचे, समानतेचे महत्त्व मुलांना कळावे. त्याकरिता शाळांमधून सर्व धर्मांचे सण साजरे व्हावेत. विविध धार्मिक स्थळे, कलाविष्कारांची ओळख मुलांना व्हावी. त्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आदर निर्माण व्हावा. सामाजिक बांधिलकी जपत शाळेने विविध कार्यक्रमांतून अशी संधी पालक- शिक्षक-विद्यार्थी यांना उपलब्ध करून द्यावी. ज्यामुळे समाजात शाळेची एक ओळख निर्माण व्हावी. ती शाळा आदर्श ठरावी.

मराठी शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना वाचनाचे दालन उघडून द्यावे की ते विद्यार्थी वाचनसंपन्न करावेत. खेळाच्या विविध संधी मुलांना द्याव्यात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, भावनिक आरोग्याची काळजी शाळेने घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याची परिस्थिती समजून घेऊन त्याला शालेय प्रवाहात आणावे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास पोषक वातावरण निर्माण करावे. शिक्षण देणारी शाळा नक्कीच त्या बालकाचे आयुष्य उज्ज्वल करेल.

शाळेमधून स्वच्छता, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्त्री-पुरुष समानता, श्रमदान, संवेदनशीलता अशा मूल्यांची रूजवण व्हावी. त्यातून समाजहित जपणारे विद्यार्थी त्या शाळेचे अभिमान ठरतील.

शाळांकडे समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जाते. मात्र समाजात मराठी शाळांचे आस्तित्व खरे धोक्यातच आहे. परंतु, जे दर्जेदार शिक्षण मराठी शाळा देऊ शकतात ते इतर नक्कीच नाही देऊ शकत. हळूहळू अनुभवातून समाजाला समाजहित लक्षात येईल. कारण भारतीय संस्कृती संस्कार संपूर्ण जगाला दिशा देण्याचे कार्य करत आहे. तेव्हा अशा मराठी शाळा म्हणजे मराठी मातृभाषेतील शाळा या विद्यार्थी घडविण्याचे, समाज जागृतीचे कार्य करून विकासाचा पाया भक्कम करतील व राष्ट्रहितार्थ कार्य करतील.

शैक्षणिक गुणवत्तबरोबर भौतिक सुविधांचाही विचार होणे गरजेचे आहे. शालेय इमारत शांत व आनंददायी परिसरात असावी. ती योग्य आकारात असून भरपूर प्रकाश, वारा येणारी स्वच्छ असावी. काही आपत्तीकाळात विद्यार्थ्यांना विनाअडथळा शाळेतून बाहेर पडता यावे. शाळेच्या भिंती बोलक्या असाव्यात. नकाशे, सुविचार, दिनविशेष सहज नजरेस पडावेत. शाळा निसर्गाशी पर्यावरणाशी मैत्री करणारी असावी. विद्यार्थ्यांना निरीक्षणास वक्तृत्वास, प्रयोग करण्यास अभिव्यक्त होण्यास वाव मिळावा. याकरिता सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण, संगणक कक्ष, डिजीटल वर्ग असावेत. अध्ययन-अध्यापनात वेळोवेळी त्याचा वापर व्हावा. विद्यार्थी संख्येनुसार पाण्याची व्यवस्था, शौचालय व्यवस्था असावी. शाळेत विविध शैक्षणिक असावे. शालेय सहल, स्नेहसंमेलन, स्पर्धा, स्पर्धापरीक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम यांत जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी करून घ्यावेत. विशेष विद्यार्थ्यांकरिता विशेष सुविधा असाव्यात. ज्यामुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहाणार नाही. शासनाकडून मिळणार्या सर्व सुविधा शाळेने सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यास सहकार्य करावे आणि सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणावे.

# भोर तालुक्यात ७ हजार ५०० हेक्टरवर खरिपाचा पीकपेरा

## शेतकऱ्यांची पेरणीची लगबग



> भोर तालुक्यात खरिपामध्ये महत्त्वाचे सोयाबीन आणि भात पीक घेतले जाते. या धर्तीवर सर्वत्र विक्रेत्यांकडे बी-बियाणे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार १ हजार ७५० क्विंटल उपलब्ध केलेले आहे. बियाणे खरेदी करून बहुतांशी शेतकऱ्यांनी पेरणी पूर्ण केलेले आहे. तर काही शेतकरी करीत आहेत.
> - संजीवन गायकवाड,
> प्रभारी तालुका कृषी अधिकारी, भोर

**भोर :** यावर्षी मान्सूनने वेळेत हजेरी लावल्याने भोर तालुक्यात खरिपातील महत्त्वाचे भात पीक ७ हजार ५०० तर सोयाबीनचा ३ हजार हेक्टरवर पेरा होणार असून, सध्या शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू आहे. बहुतांश शेतकऱ्यांची सोयाबीन, कडधान्य पेरणी तसेच भातरोपांचे तर्वे टाकणी पूर्ण झाली आहे.

तालुक्यात दर वर्षी खरिपातील पिके पेरणीवेळी खते, बी-चियाण्यांची कमतरता भासत होती. मात्र, यंदा महाबीज तसेच कर्नाटकी ॲग्रोची इंद्रायणी वगळता खते व सुधारित वाणाची बी-बियाणे विक्रेत्यांकडे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मुबलक आहेत. तर बहुतांश शेतकऱ्यांकडून मागील वर्षाचे स्वतः कडील भात व सोयाबीनचे बियाणे पेरणीसाठी वापरण्यात येत आहे. मागील आठ दिवसांमध्ये तालुक्यात जोरदार मान्सूनचा पाऊस आणि सुरुवात केली होती. दोन दिवस जोरदार बरसलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरणी थांबवली होती. मात्र, सध्या शेतात पेरणीसाठी घात आल्याने शेतकरी लगबगीने पिकांची पेरणी करीत आहेत. पेरणी वेळी मधून-अधून जोरदार पावसाच्या सरी बरसत असल्याने शेतकऱ्यांना पेरणी थांबवावी लागत आहे. तर, डोंगररांगांच्या शेजारील अडचणीच्या शेतांमध्ये ट्रॅक्टर जात नसल्याने बैलजोडी औतवाल्या मालकाला शेतात पेरणी करून देण्याची विनवणी शेतकऱ्यांना करावी लागत आहे.

### ट्रॅक्टरच्या सहाय्याने पेरणी करण्यावर जोर...

पूर्वीच्या काळात शेतातील सर्व प्रकारची मशागत वारंगुळा किंव्हा वजावणी पध्दतीने बैलजोडीच्या सहाय्याने केली जात होती. मात्र सध्या ग्रामीण भागातील गावोगावी तुरळक हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच बैलजोडी आहेत. त्यामुळे शेतातील हंगामी काम करणे शक्य होत नसून वेळेत मशागत, पेरणी पूर्ण होण्यासाठी शेतकरीवर्ग ट्रॅक्टरच्या साहाय्याने पेरणी करण्यात व्यस्त आहेत.

### शेतकऱ्याला शेत जमीन करणे झाले जिकरीचे

नोकरी निमित्त स्थलांतरामुळे शेत कामासाठी असलेला मनुष्यबळाचा अभाव,दिवसेंदिवस वाढत असलेले बियाणांच्या ,मोलमजुरीच्या किंमती, त्यायच नैसर्गिक आपत्ती व पारंपरिक पद्धतीने शेत कामासाठी असलेली बैलजोडीची कमतरता त्यामुळे ट्रॅक्टरने मशागत करावी लागत असून चार पाच वर्षापूर्वी ट्रॅक्टर चा नांगरणी, फणपाळी व पेरणी चा दर साधारणतः पाचशे ते सहाशे रुपये होता परंतु पेट्रोल डिझेल चे दरवाढीमुळे तो सध्या नऊशे ते एक हजार झाला आहे.दिवसेंदिवस वाढत असलेले पेट्रोल, डिझेलचे दर त्या मानाने शेतातून मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च पाहता शेती करणे शेतकऱ्याना जिकिरीचे होत आहे त्यामुळे बहुतांशी शेती पडीक होऊ लागली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'प्रॉब्लेम ऑफ रुपी'वर शतकोत्तर जागतिक परिषद लंडन येथे संपन्न

**पुणे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२३ मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ' दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन अंड इटस सोल्युशन' या विषयावरील प्रबंध डी.एस्सी पदवीसाठी सादर केला होता. याच्या शतकपूर्ती निमित्त सायास सहकारी संस्था, पुणे आणि मराठी अर्थशास्त्र परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने लंडन येथे जागतिक परिषदेचे आयोजन केले होते. नुकत्याच भरवण्यात आलेल्या या जागतिक परिषदेत भारताच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करणारा लेखाजोखा मांडण्यात आला.

या परिषदेसाठी ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्रा.डॉ.जरेमी झ्विगेलर ,लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स चे डॉ.फ्रान्सिस्को ट्रिकांडो मुनोरा , मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पृथ्वीराज चव्हाण व संजय देशमुख, आय.डी.बी.आय बँकेचे माजी चेअरमन किशोर खरात , दिल्ली विद्यापीठाचे प्रा.डॉ.संजोय रॉय, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे माजी जनरल मॅनेजर दीपक कांबळे, सर्वो च्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्न वराळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेसाठी ६ ते १२ जून २०२४ या कालावधित भारतातून ३१ प्रतिनिधी आणि इतर ठिकाणावरून १४ प्रतिनीधी लंडनमध्ये दाखल झाले होते. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेचे माजी संचालक रविंद्र चव्हाण, डॉ.केशव पवार, डॉ. गजानन पट्टेबहादूर, डॉ.संजोय रॉय, प्रा.डॉ.सुभाष वाघमारे, ॲड.विजयालक्ष्मी खोपडे, डॉ.सध्या नारखेडे, डॉ.वृषाली रणधीर, डॉ.मेघना भोसले, सौ. मंगला चव्हाण ,डॉ. सुधीर मस्के, ॲड समाधान सुरवाडे, अविनाश देवसटवार आदींचा सहभाग होता.

लंडन येथील किंग्ज हेन्री रोड वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रहात होते त्या घराला भेट देवून परिषदेची सुरूवात झाली.

तर ११ जुन २०२४ रोजी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स जवळील ग्रेज इन हॉल मध्ये झालेल्या या जागतिक परिषदेचे उद्घाटन मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश पृथ्वीराज चव्हाण यांनी ऑनलाईन पद्धतीने केले.

तर भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्ना वराळे यांनी समारोपाच्या सत्रात मार्गदर्शन केले. दरम्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक परिप्रेक्षातून भारताच्या आर्थिक प्रश्नावर दिशादर्शक भाष्य करणारे पुस्तक लवकरच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रेस तर्फे प्रकाशित करण्यात येणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

# लोणी काळभोर येथील विष्णूदास फलटणकर यांचे अल्पशा आजाराने निधन



**लोणी काळभोर, (पुणे) :** सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी व लोणी काळभोर (ता. हवेली) येथील विष्णूदास मारुती फलटणकर (वय ६९) यांचे रविवारी (ता. १६) रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी, सुन, नातु असा परिवार आहे. लोणी काळभोर येथील पत्रकार महेश फलटणकर यांचे ते चुलते होत.

# एक मित्र एक वृक्षचा अनोखा उपक्रम



**देऊळगाव राजे :** १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो, नेत्र तज्ञ डॉक्टर प्रेमकुमार भट्टड दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली एक मित्र एक वृक्ष हा ग्रुप नेत्रदानावरती काम करत आहे, आतापर्यंतच्या या प्रवासात ३२ मृत लोकांचे नेत्रदान करून घेण्यात ग्रुपला यश आले आहे.

वेगवेगळ्या कॉलेज, संस्था व सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून नेत्रदान याविषयी जनजागृती ग्रुप करत असतो, आज जागतिक नेतदान दिनाच्या औचित्य साधून केडगाव येथील बी.बी खळदकर नर्सिंग अँड फिजिओथेरपी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना नेत्रदान याविषयी माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाण्याजोगा होता, सर्व विद्यार्थ्यांनी या चळवळीमध्ये सहभागी होऊन जास्तीत जास्त नेत्यांकडून घेऊन आंदोलकांना दृष्टी देण्याचं कार्य प्रामाणिकपणे भविष्यात करू अशी ग्वाही दिली.

यावेळी डॉक्टर प्रेमकुमार भट्टड यांचे डोळ्यांची काळजी व नेत्रदान विषयी मार्गदर्शन मिळाले. नेत्रदान व आवयदान ही चळवळ आता तरुणांनी आपल्या हाती घेतली पाहिजे असे मत एक मित्र एक वृक्ष ग्रुप चे अध्यक्ष प्रशांत मुथा यांनी केले.

नेत्रदान व आवयदान चळवळीत बी बी खळदकर कॉलेज चळवळीत कायम सहभागी असेल असे मत डॉ. भरत खळदकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन एक मित्र एक वृक्ष ग्रुपचे संचालक डॉक्टर श्रीवल्लभ अवचट यांनी केले होते.

# तीन वर्षांपासून कांदा चाळीची प्रतिक्षाच !



**कारंजा :-** गेल्या तीन वर्षापासुन कांदाचाळीची लॉटरी लागत नसल्याने कृषी विभागाच्या या कांदाचाळ सोडतीबद्दल आता शेतकऱ्यात संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र कांरजा तालुक्यात पहावयास मिळत आहे. अशातच शेतकऱ्यांची कांदा चाळीसाठीची प्रतिक्षा मात्र अद्यापही कायम आहे.

दिवसेंदिवस या ना त्या कारणांमुळे कृषी व्यवसाय तोट्यात जात असल्याने पारंपरीक पिकांना बगल देत शेतकरी नवनविन पिके घेत आहेत. अशातच दैनंदिन खर्चासाठी हाताशी पैसा राहावा म्हणुन सिचंनाची सोय असणारे काही शेतकरी कांदा पिकाकडे वळले. त्यामुळे मागील काही दिवसात कांदा लागवडीखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली. परंतु कांदा निघाल्यानंतर अपेक्षीत भाव मिळत नसल्याने साठवणुकीचा प्रश्न निर्माण झाला. यावर उतारा म्हणुन राज्य शासनाने कृषी विभागाच्या माध्यमातुन यासाठी कांदा चाळ योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. यासाठी शेतकऱ्यांना महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागत असुन त्यानंतर त्याची सोडत जाहीर होते. आणि त्यातील पात्र शेतकऱ्यांना कांदाचाळ बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली जाते. परंतु सन २०२० मध्ये ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केले त्यांची निवड मात्र अद्यापही झाली नसल्याने या शेतकऱ्यातून नाराजीचा सुर उमटत आहे.

कांदा हा नाशवंत असला तरीही लोकांच्या दररोजच्या आहारात कांदा हा अविभाज्य भाग आहे

कांदा हा नाशवंत असला तरीही लोकांच्या दररोजच्या आहारात कांदा हा अविभाज्य भाग आहे. जून ते ऑक्टोंबर प्रसंगी फेब्रुवारीपर्यंत रब्बी हंगामात तयार झालेला कांदा पुरवून वापरला जातो आणि म्हणूनच कांदा साठवणुकीची नितातं गरज भासते. कारण या कालावधीत नवीन कांदा कोठेही उत्पादीत होत नसतो. म्हणुन शास्त्रोक्त पध्दतीने उभारलेल्या कांदाचाळीत ४-५ महिन्यापर्यंत कांदा सुस्थितीत राहू शकत असल्याने होणारे नुकसान टाळून शेतकऱ्याला आर्थिक ( फायदा वाढविता येऊ शकतो. ५० मेट्रीक टनची कांदाचाळ बांधण्यासाठी साधारणपणे २ लाख ९४ हजार तर २५ मेट्रीक टनची कांदा चाळ बांधण्यासाठी १ लाख ४८ हजार एवढा खर्च येतो. त्यातील ५० टक्के रक्कम अनुदान म्हणुन दिली जाते. परंतु गेल्या काही दिवसापासुन लोखंडाचे भाव वाढल्याने शासनाने ठरवुन दिलेल्या अंदाजपत्रकात कांदाचाळीचे बांधकाम होत नसल्याने अंदाजपत्रकीय रक्कम वाढविण्यात यावी, अशी मागणी सुध्दा केली जात आहे.

### तीन वर्षानंतरही प्रतीक्षा कायम

सन २०२० मध्ये ज्या शेतकऱ्यांनी कांदा चाळीसाठी ऑनलाईन अर्ज भरले त्यांना अद्यापही कांदाचाळीची लॉटरी लागली नाही. त्यामुळे कृषी विभागाच्या लॉटरी संदर्भात शेतकऱ्यात संभ्रम निर्माण झाला असून, अद्यापही शेतकऱ्यांना कांदा चाळीची प्रतीक्षा कायम आहे. त्याबरोबरच सद्य परिस्थितीत दिल्या जात असलेल्या अनुदानात वाढ करण्यात यावी अशी मागणी सुद्धा शेतकऱ्यांतून केली जित आहे.

# ऐन पावसाळ्यात रायगड जिल्ह्यात ४२२ जागांसाठी पोलीस भरती

## ३१ हजार जणांची पावसात शारीरिक चाचणी घेण्याचे आव्हान



**अलिबाग :** रायगड पोलीस दलातील ४२२ रिक्त पदांसाठी ऐन पावसाळ्यात पोलीस भरती होणार आहे. पावसाच्या कालावधीत ३१ हजार ६३ जणांची शारीरिक चाचणी घेण्याचे मोठे आव्हान यंत्रणेसमोर असणार आहे. याच वर्षी जानेवारी महिन्यात रायगड पोलीस दलातील २१८ जागांसाठी पोलीस भरती प्रक्रीया पार पडली होती. आता ४२२ जागांसाठी भरती प्रक्रीया पार पडणार आहे. यात ३९१ पोलीस शिपाई, ९ बॅन्ड्समन पोलीस शिपाई आणि ३१ चालक पोलीस शिपाई पोलीस पदांचा समावेश आहे.

बँण्ड्समन पोलिसांच्या ९ जागांसाठी १ हजार ३८३ पुरूष तर ३९० महिला उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. ३९१ पोलीस शिपाई पदासाठी २३ हजार ९७३ पुरुष तर ४ हजार ८६० महिला उमेदवारांचा समावेश आहे. तर ३१ चालक पोलीस शिपाई पदासाठी २ हजार ०९६ पुरुष तर १३४ महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. २१ जून पासून ३१ हजार ०६३ उमेदवारांच्या शारीरिक चाचणीला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

पावसाचे दिवस असल्याने यंदा ही भरती प्रक्रीया अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात घेतली जाणार नाही. त्या ऐवजी नेऊली येथील जिल्हा क्रीडा संकुलात कागदपत्र पडताळणी, शारिरीक मोजमाप, १०० मीटर धावणे आणि गोळाफेक चाचणी होणार आहे. तर ८०० आणि १६०० मीटर धावणे चाचणी आरसीएफ कॉलनी कुरूळ येथे पार पडणार आहे. दररोज ८०० ते १००० मुलांना चाचणीसाठी बोलवले जाणार आहे. त्यामुळे ३१ हजार उमेदवारांची शारीरिक चाचणी पूर्ण होण्यासाठी साधारणपणे एक महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

पावसाचे दिवस असल्याने या शारीरिक चाचणी प्रक्रीयेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. अशावेळी उमेदवारांना चाचणीसाठी पुढील तारीख देण्याचे नियोजन ठेवण्यात आले आहे. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणात कितीतरी जास्त पाऊस पडतो. अशावेळी पावसात उमेदवारांच्या शारीरिक चाचण्या घेणे हे यंत्रणेसाठी चांगलेच आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे.

राज्यात सगळीकडे एकाच वेळी पोलीस भरतीची प्रक्रीया होत आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातही पोलीस प्रशासनाने भरती प्रक्रिया निपक्षपातीपणे पार पडावी यासाठी नियोजन केले आहे. कोणत्याही गैरप्रकाराला या प्रक्रियेत थारा दिला जाणार नाही. पावसामुळे एखाद दिवशी शारिरीक चाचणी झाली नाही तर त्या दिवशीच्या उमेदवारांना सोयीस्कर दिवशी पुन्हा बोलविले जाणार आहे.

भरतीप्रक्रीये दरम्यान कोणत्याही व्यक्तीकडून ओळखीचे, अमिष दाखवून पैशाची मागणी केली गेल्यास, उमेदवारांनी थेट पोलीस अधिक्षक कार्यालयात ०२१४१-२२८४७३ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि तक्रार नोदवावी. दरम्यान लांबून भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी राहण्याच्या व्यवस्थेचे नियोजन आम्ही करत आहोत.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पंढरपूर आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना २० हजार रुपयांचे अनुदान : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**पिंपरी :** पंढरीची आषाढी वारी समीप आली आहे. तर प्रशासकीय तयारी सुरु झाली आहे. राज्य शासनाने सोहळ्यातील तीन हजार दिंडयांना २० हजार अनुदानाची घोषणा दस्तुरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. त्यावरून वारकरी संप्रदायात मत - मतांतरे सुरु झाली आहेत. आक्षेप -प्रति आक्षेप होऊ लागले आहेत. शासनाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या देवस्थानांनी याबाबत सावध भूमिका घेतली आहे. तर 'अखंडपूर्ण वारीची वाट चालणाऱ्या संतांच्या पायिकांनी विरोध दर्शविला आहे.

दिंड्याना अनुदान नको, वारी आणि तीर्थक्षेत्रावर सेवासुविधांचे सक्षमीकरण करा, तसेच काही दिंड्या अनुदान मिळतेय ते घ्या अशी संमिश्र भूमिका आणि सूर वारकरी संप्रदायातून उमटत आहे.

पंढरीचा वारकरी, वारी चुको न दे हरि वारी म्हणजे वारकरी संप्रदायाचा गाभा आणि विठ्ठलचरणी तल्लीन होऊन नाचत गात पंढरीच्या विठूरायाला भेटण्याची ओढ या वारकरी संप्रदायातल्या प्रत्येकाला असतेच. वारीची ओढ सुरु झाली आहे. स्थानिक प्रशासनापासून तर जिल्हा राज्य शासनाच्या वतीने सोहळ्याची तयारी सुरु आहे. त्यामुळे बैठका सुरु झाल्या आहेत. त्यावेळी मुंबई येथील बैठकीत 'पंढरपूर आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. यंदाची आषाढी वारी स्वच्छ, निर्मल आणि सुरक्षित व्हावी यासाठी शासन सर्वतोपरी नियोजन करत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. याबैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत होते.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. नियोजना संदर्भात पुण्यात तसेच मुंबई येथे बैठक झाली. त्यामध्ये प्रशासनाची तयारी आणि शासनाकडून होणारे सहकार्य याबाबत माहिती देण्यात आली. शासनाने दिंड्यांसाठी जाहीर केलेल्या अनुदानाबाबत काही वारकरी विरोध करत आहेत, हा त्यांचा विरोध व्यक्तिगत आहे. वारी सोहळ्यास आणि दिंडयांना बळ देण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

**अशा आहेत वारकऱ्यांच्या अपेक्षा**

१) पालखी मार्ग रुंदीकरण काही भागात अपूर्ण आहे. पालखी तळ जागाचा प्रश्न आहे. जागांचा प्रश्न सोडवायला हवा.

२) वारीमार्गावर आता वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाची मोहीम, पर्यावरणाची वारी करण्याची गरज. निर्मलवारी संकल्पनेस बळ द्यायला हवे. वारीकाळात वैद्यकीय सुविधा सक्षम कराव्यात.

३) देहू, पंढरपूर आणि आळंदी या तीर्थ क्षेत्रमध्ये इंद्रायणी आणि चंद्रभागा नदी आहे. तिचे प्रदूषण थांबलेले नाही. प्रदूषण रोखण्याची गरज आहे.

# धनुष्यबाण शिंदेसेनेचाच; राज्यात आमचीच ताकद अधिक : मंत्री सामंत



**रत्नागिरी :** लोकसभा निवडणूक निकालानंतर धनुष्यबाण निशाणीबाबत काही गैरसमज पसरवले जात आहेत. मात्र चिन्ह कोणाला द्यावे, याबाबतचे निकष आहेत. त्यासाठी घटना पाहिली जाते. त्यामुळे या चर्चांना कोणताही आधार नाही, असे उद्योगमंत्रीउदय सामंतयांनीरत्नागिरीतीलपत्रकार परिषदेत सांगितले. त्यातही शिंदेसेनेने निवडणुकीत मिळवलेले यश उद्धवसेनेपेक्षा मोठे असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

लोकसभा निवडणुकीत उद्धवसेना अधिक जागा जिंकली आहे, असे सांगत धनुष्यबाण निशाणीबाबत गैरसमज पसरवण्याचे काम काही लोक करत आहेत. मात्र चिन्ह कोणाचे हे ठरवण्याचे निकष वेगळे आहेत, असे ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात शिंदेसेनेचा स्ट्राईक रेट अधिक आहे. शिंदेसेनेने १५ जागा लढवल्या आणि त्यात सातजण वीजयी झाले. उद्धवसेनेने २३ जागा लढवल्या आणि त्यात त्यांचे ९ उमेदवार विजयी झाले. शिंदेसेनेचा स्ट्राईक रेट ४६.६७ टक्के आहे तर उद्धवसेनेचा ४२.६६ टक्के आहे. मतांच्या सरासरीमध्यही शिंदेसेनेला उद्धवसेनेपेक्षा अडीच लाख मते अधिक आहेत.

राज्यात १३ ठिकाणी शिंदेसेना आणि उद्धवसेना आमनेसामने लढत झाली. त्यात ७ ठिकाणी शिंदेसेनेला यश आले आहे. शिंदेसेनेचे सरासरी मताधिक्य १ लाख ६ हजार आहे तर उद्धवसेनेचे सरासरी मताधिक्य ८६ हजार ९४४ आहे. प्रत्येक बाबतीत शिंदेसेनेने उद्धवसेनेला मात दिली आहे. त्यामुळे आता बिनबुडाच्या चर्चा कोणी करु नयेत, असे ते म्हणाले.

## महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचे ठरले सूत्र

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने घटक पक्षांमधील जागावाटपाचे प्राथमिक सूत्र निश्चित करी निवडणुकीच्या दृष्टीने तयारीसाठी आघाडी घेतली आहे. जागा वाटपाच्या प्राथमिक सूत्रानुसार काँग्रेस १०० जागा लढविणार आहे तर शिवसेना उद्धव ठाकरे गट ९० ते ९५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ८० ते ८५ जागांवर निवडणूक लढविणार आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत जागा वाटपाला विलंब झाल्यामुळे अनेक उमेदवारांना फटका बसला. या निवडणुकीत तसे होऊ नये यासाठी महायुतीने जागा वाटपाचे प्राथमिक सूत्र निश्चित केले आहे.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस, कोकण आणि मुंबईत शिवसेना तर पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्राधान्य असणार आहे.



# वायनाड मतदारसंघातून प्रियंका गांधी लढणार?

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीचा निकाल लागून १० दिवसांहून अधिक काळ लोटला आहे. यंदाच्या निवडणुकीतराहुल गांधी हे वायनाड आणि रायबरेलीया दोन मतदारसंघातून निवडून आलेत. त्यामुळे त्यांना या दोन्ही मतदारसंघापैकी एकाची निवड करावी लागणार आहे.राहुल गांधींनानिर्णय घेण्यासाठी आता ४८ तास उरलेत.रायबरेली या काँग्रेसच्यापारंपारिक मतदारसंघातून राहुल गांधी ३ लाख ९० हजार तर वायनाडमधून ३ लाख ६४ हजार मताधिक्याने राहुल गांधींचा विजय झाला आहे.

नियमानुसार, राहुल गांधी यांना वायनाड किंवा रायबरेली या दोन मतदारसंघापैकी एक जागा सोडावी लागेल. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून १४ दिवसांत २ पैकी एक मतदारसंघ सोडण्याचा नियम आहे. जर १४ दिवसांत कुठल्याही एका जागेवरून राजीनामा न दिल्यास दोन्हीही जागा रिक्त मानल्या जातात. याचा अर्थ १८ जूनपर्यंत रायबरेली अथवा वायनाड यातील एका जागेवरून राहुल गांधींना राजीनामा द्यावा लागेल. कुठल्याही सदस्याला राजीनामा द्यायचा असेल तर लोकसभा अध्यक्षांकडे लिखित स्वरुपाने द्यावा लागतो. जर एखाद्या सदस्याने राजीनामा दिला तर ६ महिन्याच्या आत त्या जागेवर पोटनिवडणूक घ्यावी लागते.

सध्या लोकसभा सचिवांकडून राजीनामा स्वीकारल्यानंतर त्याचे गॅजेट प्रसिद्ध केले जाईल आणि त्यानंतर ते निवडणूक आयोगाला पाठवले जाईल. निवडणूक आयोग त्या जागेला रिक्त घोषित करून त्याठिकाणी पोटनिवडणुकीसाठी अधिसूचना काढेल. राहुल गांधी हे वायनाड मतदारसंघातून राजीनामा देऊ शकतात आणि त्याठिकाणी होणाऱ्या पोटनिवडणुकीत प्रियंका गांधी निवडणूक लढतील असं बोललं जातंय परंतु प्रियंका गांधी निवडणूक लढणार की नाही याबाबत सस्पेन्स आहे. लोकसभा निकालानंतर राहुल गांधी यांनी मतदारांचे आभार मानत मी कुठली जागा सोडावी आणि कुठल्या जागेवर कायम राहावे याबाबत द्विधा मनस्थितीत आहे असं म्हटलं मात्र जो काही निर्णय असेल त्याने सर्वांनाच आनंद होईल असे सूतोवाच त्यांनी केले. त्यामुळे वायनाडमधून प्रियंका गांधी निवडणूक लढतील अशी चर्चा सुरू झाली. या चर्चेला केरळ प्रदेशाध्यक्षांनीही दुजोरा दिला. राहुल गांधी वायनाडमधून राजीनामा देतील असं प्रदेशाध्यक्ष के सुधाकरन यांनी संकेत दिले.

# खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजारचा नवा प्रयोग

## शेतकरी कार्यसमिती देणार शेतकरी हितासाठी योगदान



**ढोलबारे :** अलिकडे महिनाभरापूर्वीच बागलाण तालुक्यातील ढोलबारे येथे सुरु झालेल्या 'खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समिती'ने शेतकरी हिताच्या दृष्टीने नवा प्रयोग राबविला आहे.

बाजार समितीच्या निर्णप्रक्रियेत शेतकरी हिताचे निर्णय घेण्यासाठी शेतकरी, विविध चळवळींमधिल घटक, महिला यांचा सहभाग असावा या हेतूने बाजार समितीचे सभापती सुरेश (नाना) पवार यांच्या संकल्पनेतून 'शेतकरी कार्य समिती' निर्माण करण्यात आली. या कार्यसमितीमध्ये शेतकरी चळवळीबरोबरच विविध क्षेत्रातील विभिन्न वयोगट आणि समाजघटकांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

या 'शेतकरी कार्यसमितीमधिल नवनियुक्त सदस्यांचा सत्कार समारंभ बाजार समितीच्या आवारात पार पडला.

माँ जिजाऊंच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस आणि महान शेतकरी नेते स्व. शरद जोशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत दीपप्रज्वलन, अभिवादन झाल्यानंतर या सत्कार समारंभाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत सभापती सुरेश (नाना) पवार यांनी सांगितले की, शेतकरी हा केंद्रबिंदू माणून, शेतकरी हिताला प्राधान्य देत, 'खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार' शेतकऱ्यांसाठी आपले हक्काचे व्यासपीठ उभे केले आहे. बळीराजाची समृद्धी हा दृष्टीकोन समोर ठेऊन धोरणप्रक्रिया आणि निर्णयप्रक्रियेत शेतकरी प्रतिनिधी असावेत, त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा लाभ शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी व्हावा या हेतूने ही शेतकरी कृतीसमिती निर्माण केली असून बळीराजाच्या कल्याणासाठी आपण कटीबद्ध आहोत, त्याबरोबरच ही बाजार समिती अधिकाधिक सर्वसमावेशक करण्यासाठी प्रयत्नशील असून लवकरच याच आवारात भाजीपाला, फळ आणि धान्य मार्केटही सुरु करणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाप्रसंगी शेतकरी नेते दिपक बापूजी पगार, भाऊसाहेब अण्णा अहिरे, बिंदूशेठ शर्मा, आदिंनी मनोगत व्यक्त करत बाजार परिसरात सुरु करण्यात आलेल्या सुविधांबद्दलही कौतूक केले. शेतकऱ्यांना मोफत चहा-अल्पोपहार, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, व्यापारी विश्रांतीसाठी कक्ष, प्रशस्त पार्किंग यांसारख्या प्रमुख वैशिष्ट्यांमुळे 'खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार' ही आदर्श ठरली असून शासनाने देखील हा आदर्श घ्यावा अशी अपेक्षाही यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

शेतकरी प्रतिनिधींच्या इच्छा आणि आकांक्षा लक्षात घेत बाजाराचे सचिव गणेश पवार यांनी आपल्या मनोगतातून शेतकऱ्यांच्या अपेक्षापुर्तीसाठी, शेतकरी हितासाठी आपण सर्वो तोपरी बांधील असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. शेतकरी हे आमचे दैवत असल्याचेही यावेळी गणेश पवार म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कृष्णा (नाना) भामरे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्यांनी आपल्या अध्यक्षिय मनोगतात सांगितले की, या बाजार समितीमुळे शेतकऱ्याला उत्तम पर्याय उपलब्ध झाला असून ढोलबारे गावाचे नाव कांदा निर्णातीच्या व्यवहारांमुळे जगाच्या पाठीवर पोहणार आहे.

त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत अधिकाधिक शेतकऱ्यांनी या बाजार समितीचा लाभ घ्यावा असे आवाहन देखिल केले.

याप्रसंगी नवनियुक्त शेतकरी कार्यसमितीमधिल शैलेन्द्र जिभाऊ कापडणीस, महेश विजय देवरे, सुभाष साहेबराव शिंदे, रविंद्र चिला अहिरे (भाऊसाहेब आण्णा), पंडित नारायण साळवे (माजी प्राचार्य), बिंदुशेठ रविशेठ शर्मा, ज्योतीराव उद्धव बागुल, संजय शांताराम भदाणे, मयुर कौतिक नेरकर, संदीप प्रकाश गांगुर्डे, सुनिल नामदेव वाघ, प्रवीण भगवान अहिरे, विनोद राजाराम पाटील, डॉ. कपिल यादवराव अहिरे, सुनिल शिवराम गवळी, नितीन जयंतराव अहिरराव, प्रदीप सयाजी देवरे, नयन लक्ष्मण सोनवणे, अनिल रामदास भामरे, भास्कर हरी बागुल, राजाराम महिपत गांगुर्डे, रावसाहेब दावल ठोंबरे, भिला काशीनाथ ठोंबरे, संगीता दिपक नांद्रे, चंद्रकला गोपीचंद चौरे

आदि नवनियुक्त सदस्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला, याप्रसंगी पांडूरंग पवार, सुभाष नंदन, काका निकम, कृष्णा नाना, भाऊसाहेब भामरे, डी. डी खैरणार, लक्ष्मण शिंदे, राहूल पवार यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, शेतकरी, व्यापारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. अमोल बच्छाव यांनी केले, तर आभार चेतना पगारे यांनी मानले.

# विद्यार्थ्यांना लाभेना वेळत प्रवास

**सातारा :** ग्रामीण भागातील एस.टी बस म्हणजे गोरगरिबांच्या प्रवासाचे हक्काचे वाहन आहे. आता शाळा महाविद्यालय सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांना एस.टी बस शिवाय पर्याय नाही. शाळेतून मिळतोय एसटी पास पण विद्यार्थ्यांना लाभेना वेळेत एसटी प्रवास अशी अवस्था पाहण्यास मिळाली आहे.

सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातून शिक्षण व उच्च शिक्षण घेण्यासाठी गोरगरीब, कष्टकरी ,शेतकरी, शेतमजूर यांची मुले सकाळी सहा वाजता उठून रात्रीच्या मुक्कामी एस.टी. बसने सातारा शहराकडे शिक्षणासाठी येतात. दुपारी शैक्षणिक तास संपल्यानंतर त्यांना परतीच्या प्रवासाच्या वेळेला दुपारी बारा वाजता सुटणारी एस.टी. बस तीन वाजता मिळत आहे. ज्यांच्याकडे जेमतेम पैसे आहेत. अशी मंडळी वडापच्या वाहनाने आपल्या गावी जात आहेत. तर काहींच्याकडे पैसे नसल्यामुळे त्यांना तीन तीन तास एस.टी. प्रवासासाठी थांबवावे लागत आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आल्यानंतर अनेक जादा बसेस पंढरपूरच्या दिशेने रवाना होतात. अशा वेळेला विद्यार्थ्यांना पांडुरंग.. पांडुरंग... म्हणण्याची वेळ येते. दि १५ जून पासून शाळा- महाविद्यालय सुरू झाले असून शासनाच्या एसटी महामंडळाच्या ६६ टक्के इतक्या तिकिटा मधील सवलतीमुळे अनेक विद्यार्थी हे एस.टी. बसचे पास काढून प्रवास करतात. दोन दिवस जरी पास काढण्यासाठी उशीर झाला तर एसटी बस प्रवासासाठी सवलत मिळत नाही. त्यांना संपूर्ण एसटीचे प्रवास भाडे भरावे लागते. काहींना एस.टी.तून प्रवास करणे याशिवाय पर्याय उरत नाही. शासनाच्या पुण्यश्लोक पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत एस.टी. पास वितरण केलेले आहे. सातारा जिल्ह्यात दररोज एस.टी.चे नियमित प्रवासी आहेत.

# भाजपने सुरू केली विधानसभेची तयारी

## महाराष्ट्रासह या चार राज्यांत प्रभारी आणि सहप्रभारी नेमले

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीनंतर आता भाजपने आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या वर्षी चार राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. यातमहाराष्ट्र, हरियाणा,झारखंडआणिजम्मू-काश्मीरचासमावेश आहे. दरम्यान, भाजप हायकमांडने या चार राज्यांसाठी नवीन निवडणूक प्रभारी आणि सह-प्रभारी नियुक्त केले आहेत. भूपेंद्र यादव यांनामहाराष्ट्राचेप्रभारी बनवले आहे, तर अश्विनी वैष्णव सहप्रभारी म्हणून काम पाहतील.

दुसरीकडे, हरियाणामध्ये धर्मेंद्र प्रधान यांना प्रभारी बनवण्यात आले आहे, तर विपलव कुमार देव सहप्रभारी असतील. तसेच शिवराज सिंह चौहानझारखंडचेप्रभारी असतील. त्यांच्या मदतीला आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि सहप्रभारी म्हून काम पाहतील. यासोबतच जी किशन रेड्डी यांनाजम्मू-काश्मीरचेप्रभारी बनवण्यात आले आहे. ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीरमध्ये ३० सप्टेंबरपूर्वी निवडणुकीची शक्यता

जम्मू-काश्मीरमधील विधानसभेच्या ९० जागांसाठी ३० सप्टेंबरपूर्वी मतदान होण्याची शक्यता आहे. यानंतर उर्वरित तीन राज्यांमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुका होऊ शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजप सर्व ९० जागांवर उमेदवार उभे करू शकते. येथे शेवटची विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये झाली होती. भाजप आणि पीडीपीचे युतीचे सरकार स्थापन झाले, पण हे सरकार जून २०१८ मध्ये पडले.

**ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये झारखंड-महाराष्ट्र-हरियाणामध्ये निवडणुका**

झारखंड, महाराष्ट्र आणि हरियाणामध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. या तीन राज्यांच्या सद्यस्थितीबद्दल बोलायचे झाले, तर हरियाणामध्ये भाजपचे सरकार आहे. नायबसिंग सैनी हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. लोकसभा निवडणुकीतील उत्कृष्ट कामगिरीमुळे यावेळी काँग्रेसचेही मनोबल उंचावले आहे.

त्यांनी हरियाणात सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपने ५ जागा गमावल्या तर काँग्रेसने ५ जागा जिंकल्या. २०१९ मध्ये काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही.

झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसचे युतीचे सरकार आहे. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री चंपाई सोरेन आहेत. दुसरीकडे महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत. त्यांना भाजप, आणि अजित पवार गटाची साथ आहे.

# साताऱ्यात जुलैमध्ये ऐतिहासिक वाघनख्याची प्रतीक्षा

**सातारा :** छत्रपतींची राजधानी असलेल्या सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज प्राचीन वस्तू संग्रहालयामध्ये जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात शिवाजी महाराजांनी शौर्य दाखवले ती वाघनखे साताऱ्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालयाचे सातारसह पश्चिम महाराष्ट्रातील शिवप्रेमींना वाघनख्याची प्रतीक्षा सुरू झालेली आहे. छत्रपती शिवाजी वस्तू संग्रहालयाचे अधीक्षक श्री प्रविण शिंदे यांनी वाघ नखे ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे.

याबाबत माहिती अशी की, पोलादीपट्टीवर पाच इंच अंतर व चार सव्वा इंच लांबीचे तीक्ष्ण वाघनखे व त्याला तिन्ही बाजूने शिरा व खालच्या बाजूला धार असलेले दोन्ही बाजूच्या अंगठ्या असणारी ही वाघ नखे सध्या इंग्लंडच्या म्युझियम मध्ये असून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचा वापर केला होता .असा इतिहास तज्ञांचे मत आहे. हीच वाघनखे पुन्हा साताऱ्यात येणार आहे. वास्तविक पाहता राजा जयसिंग यांनी तयार केलेली पोलादी धातूची वाघ नखे टिपू सुलतानाच्या घरी नोकरीस असलेल्या सुबाप्पा पैलवान यांच्या जवळच्या व्यक्तीकडून ती घेण्यात आलेली असल्याची इतिहासात नोंद आहे .

या वाघनख्यासाठी खबरदारीचे उपायोजना छत्रपती शिवाजी प्राचीन वस्तू संग्रहालय सातारा या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत . ग्रील दरवाजा व सेंसर असल्यामुळे या वाघनख्याची सुरक्षा भेदून कोणालाही आत जाता येणार नाही. अशी चोख व्यवस्था करण्यात आलेली आहे.

शिवरायांनी अफजलखान वधावेळी वापरलेली वाघनखे आज कुठे आहेत,? याचा नेमका ठावठिकाणा सांगता येत नाही; पण इंग्लंडस्थित व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियममध्ये शिवरायांची म्हणून एक वाघनखे ठेवलेली आहेत . ती वाघनखे या म्युझियमला मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ यांचा वंशज अँड्रियन ग्रँट डफ यांच्याकडून भेट म्हणून मिळालेली होती.

जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ हा मराठ्यांचा इतिहास लिहिणारा इंग्रज अधिकारी सातारा संस्थानचा रेसिडेंट म्हणून काम करत होता. त्यावेळी त्याची आणि छत्रपती प्रतापसिंह महाराजांची दोस्ती झाली होती. त्यातूनच प्रतापसिंह महाराजांनी ग्रँट डफला आपल्याकडील एक वाघनख भेट दिले होते.

याची नोंद स्वतः एल्फिन्स्टनने एका पत्रात केली आहे.

शिवाजी महाराजांची म्हणून ओळखली जाणारी आणखी दोन वाघनखं इ. स. १९१९ पर्यंत तरी सातारकर छत्रपतींच्या राजवाड्यात पाहावयास मिळत होती.

इ. स. १८७४ मध्ये हा डफचा मुलगा भारत भेटीवर आला होता. त्यावेळी त्याने सातारा येथील राजवाड्याला भेट दिली होती. त्या वेळी या ठिकाणी दोन वाघनखंही पाहिली होती. त्याचे वर्णन त्याने आपल्या 'नोट्स ऑफ इंडियन जर्नी' या पुस्तकात लिहून ठेवले आहे.

आज व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियममध्ये असणारी वाघनखेही शिवरायांची आहेत याला अजूनपर्यंत तरी सबळ पुरावा नाही. कारण अशा पद्धतीची वाघनखे प्रतापसिंह महाराजांनी ग्रँट डफ व एल्फिन्स्टनला दिली होती. इ. स. १८२६ च्या अगोदर आणि त्यानंतर इ. स. १८४४ पर्यंत शिवरायांची म्हणून ओळखली जाणारी दोन वाघनखे सातारा छत्रपतींकडे होती.

# पराभवानंतर नवनीत राणा यांचे मानसिक संतुलन बिघडले : बच्चू कडू



**कराड :** नवनीत राणा सतत टी. व्ही. वर दिसायच्या त्यामुळे राणा जरा दबुन गेला होता. त्यांच्या घरात अंतर्गत कलह आहे. त्यामुळे स्वाभिमान पार्टीनेच भाजपाच्या नवनीत राणाला पाडले आहे.

पण पराभवानंतर त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे, पराभव त्यांना पचवता येत नाही. आता मलाच त्यांच्याकडे डॉक्टरांना पाठवावे लागेल अशी बोचरी टीका प्रहार जनशक्तीचे नेते आमदार बच्चूकडू यांनी केली.

कराड येथे सोमवारी आमदार बच्चू कडू यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी प्रहार जनशक्तीचे मनोज माळी व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

आमदार बच्चू कडू म्हणाले, गेल्यावेळी नवनीत राणा निवडून आल्या राष्ट्रवादीच्या पाठींब्यावर आणि नंतर मोदी यांच्याजवळ गेल्या.

आता सुध्दा भाजपाचे राज्यात सरकार नाही आले तर स्वाभिमान पार्टी पुन्हा आघाडीबरोबर जाऊन बसेल.

बायको भाजपात आणि हे स्वाभिमानमध्ये त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम झाला. त्याचा फटका त्यांना बसला आहे. तुम्ही कपटी आहात अशी टीका तुमच्यावर होतेय याबाबत विचारताच बच्चू कडू म्हणाले, जे नालायक आहेत त्यांच्यासाठी आम्ही कपटीचं आहोत.

# सिक्कीममध्ये गेलेले नाशिकचे सर्व पर्यटक सुखरूप



**नाशिक :** सिक्कीम मध्ये दरड कोसळल्याने आपत्ती निर्माण झाली आहे. मात्र नाशिकहून गेलेले पर्यटक सुखरूप असल्याचे वृत्त आहे. वाहतूक कोळंबा झाल्यामुळे प्रवासी हळूहळू पुढे सरकत असले तरी कोणाच्याही जीवाला धोका नसल्याचे टूर अँड टुरिस्ट व्यवसायिकांनी सांगितले.

मुसळधार पावसामुळे सिक्कीम मध्ये दरड कोसळली असून त्यामुळे देशातील अनेक पर्यटक या ठिकाणी अडकले आहेत. नाशिकहून गेलेले देखील अनेक पर्यटक अडकल्याचे वृत्त आहे.

मात्र सर्वजण सुरक्षित आहेत तर काहीजण तेथून बाहेर पडले आहेत,असे पर्यटन व्यवसायिकांनी सांगितले.

या संदर्भात तान या पर्यटन व्यावसायिक संघटनेचे माजी अध्यक्ष दत्ता भालेराव यांनी सांगितले की, बाग डोंगरा ते गंगटोक या रस्त्यावरती दोन ठिकाणी लँडसलाईड झाल्यामुळे रस्ता बदलला आहे.

थोडेसे लांबून यावे लागत आहे. कॅलिंपोंग मार्गे वाहतूक सुरू आहे. परंतु काही अडचण नाही. सगळे लोक योग्य ठिकाणी पोहोचलेले आहेत.

आपले नाशिकचे जवळपास ३०-४० लोक वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. पण कुणी कुठे अटकलेले नाहीये. फक्त रस्ता व अंतर वाढले आहे, असे त्यांनी सांगितलं.

# १९ जून रोजी पोलीस कवायत मैदान येथे भरती प्रक्रिया

**कोल्हापूर :** कोल्हापूर पोलीस दलातील रिक्त असणाऱ्या पोलीस शिपाई आणि पोलीस वाहन चालक पदासाठी १९ जून रोजी पोलीस कवायत मैदान येथे भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. यासाठी आरएफआयडी मशिन, ५० सीसीटीव्ही कॅमेरे, २५० पोलीस अधिकारी व कर्मचारी नियुक्त केले आहेत. भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शी होणार असल्याने पात्र उमेदवार यापासून वंचित राहणार नाही. अशी माहिती पोलीस अधीक्षक महेंद्र पंडीत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोल्हापुरात २०२२ व २०२३ मध्ये रिक्त असणाऱ्या पोलीस शिपाई १५४ व पोलीस वाहन चालक ५९ पदासाठी रिक्त झालेल्या २१३ जागांसाठी ही भरती प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी १ मार्च,२०२४ रोजी जाहीरात प्रसिध्द करून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले होते. पोलीस शिपाई पदासाठी ६७७७ उमेदवारांचे तर चालक पदासाठी ४६६८ असे एकूण ११,४४५ अर्ज दाखल झाले आहेत. यात ९५५० पुरुष तर १६८९ महिला, माजी सैनिक २०६ उमेदवारांनी अर्ज केले आहेत.

# ...तर मी ओबीसींच्या आंदोलनात पुन्हा उतरेन मंत्री छगन भुजबळांचा सरकारला इशारा

**मुंबई :** ओबीसींवर अन्याय होत असेल तर मी आंदोलनात उतरेन, असा इशारा देतानाच केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणी अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्रीछगन भुजबळयांनी केली आहे. समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी रविवारी मुंबईत भुजबळ यांची भेट घेऊन विविध प्रश्नांवर चर्चा केली. मराठा समाजाचे आंदोलन, ओबीसींवर



होणारा अन्याय, त्याचप्रमाणे लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि त्या निवडणुकीत ओबीसी समाजाने घेतलेल्या भूमिकेबाबत या बैठकीत चर्चा झाली.

केंद्रात पुन्हा एकदा नरेंद्र मोदीयांच्या नेतृत्वाखाली सरकार आलेले आहे. त्यांना पाठिंबा देणाऱ्या नितीशकुमार यांनी बिहारमध्ये जातनिहाय जनगणना केलेली आहे. केंद्र सरकारने देशभर जातनिहाय जनगणना केली तर ओबीसींची खरी परिस्थिती समोर येईल. तसेच, एससी, एसटी समाजाला जसा केंद्राकडून निधी मिळतो, तसा निधी ओबीसींसाठी मिळेल, अशी भूमिका भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना मांडली.वेगळा निर्णय घेणार?लोकसभेसाठी उमेदवारी मिळाली नाही तसेच राज्यसभेसाठी पक्षाने संधी दिली नाही,

या पार्श्वभूमीवरछगन भुजबळयांनी वेगळा निर्णय घ्यावा, अशी मागणी समता परिषदेच्या या बैठकीत कार्यकर्त्यांनी केल्याची चर्चा सोमवारी दिवसभर सुरू होती. मात्र. याला दुजोरा मिळू शकलेला नाही.

# मंत्री मुरलीधर मोहोळ यांचा वर्गमित्राकडून 'कोल्हापुरी स्टाईल' सत्कार



**कोल्हापूर :** केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झालेले भाजपचे पुण्याचे खासदारमुरलीधर मोहोळयांचा कोल्हापुरातील मित्रपरिवाराने रविवारी पहाटे पुण्यात पोहोचून खास कोल्हापुरी शैलीत सत्कार केला.

या मित्रांनी आपल्या वर्गमित्राचा खारीक आणि खोबरे यांचा तब्बल ३५ किलोंचा हार त्यांच्या गळ्यात घालून पहिलवानी अभिनंदन केले.

१९९० ते १९९४ या काळात कुस्तीचे धडे कोल्हापुरात गिरवत असताना मोहोळ यांनी कॉमर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. त्यावेळचे त्यांचे वर्गमित्र गुलाबराव देशमुख, प्रशांत घोरपडे, संतोष पोतदार, चंद्रकांत कदम आणि शिवराज देशमुख यांच्यासह विश्वनाथ बनछोडे, अल्लाउद्दीन बालेखान, रणजीत घोडके यांनी हा अनोखा सत्कार केला.

देशात भाजपप्रणित एनडीए सरकार स्थापनेनंतर महापौर ते खासदार असा प्रवास करणारे मुरलीधर मोहोळ यांची मंत्रिमंडळात वर्णी लागली.


मोहोळ यांना केंद्रीय मंत्रिमंडळात सहकार आणि नागरी उड्डान खात्याचे राज्यमंत्रिपद मिळाले आहे. त्यामुळे पुण्यातील विमानतळ तसेच सहकार खात्याशी संबंधित प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा आहे.

## वादग्रस्त रिल्स करणाऱ्यावर होणार कारवाई

**कोल्हापूर ;** शस्त्र हातात घेऊन धमकावणारे व्हिडिओ आणि त्यातून एकमेकाला आवाहन देणारी भाषा असलेले रिल्स तयार करून सोशल मिडीयात प्रसारित करण्याचे प्रमाण अलीकडच्या काही महिन्यात जिल्ह्यात वाढत चालले. यातूनच शहरात खून ,खुनी हल्ला,हाणामारीचे प्रकार वाढलेत. या पार्श्वभूमीवर आता कोल्हापूर पोलीस दल क्शन मोडवर असून आता अशा रिलस स्टारवर कडक कारवाई करणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी दिलीय.

कोल्हापूर शहर आणि उपनगरात गेल्या काही महिन्यांपासून युवकांच्या दोन गटातील वर्चस्व वादातून खून खुनी हल्ला, हाणामारी च्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होते झाली आहे. शहरातील राजेंद्र नगर झोपडपट्टी, जवाहरनगर, दौलतनगर ,कणाननगर वारे वसाहत ,गंजीमाळ, सदर बाजार झोपडपट्टी या परिसरातील गुन्हेगारांनी गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात अक्षरशः धुमाकूळ घातलाय. दोन्ही गटातील वर्चस्व वादातून थेट एकमेकाला संपवण्याचे संदेश सोशल मीडियातून रिलस् माध्यमातून दिले जाता आहेत. शहरातील १८ ते २५ वयोगटातील तरुण रीलसच्या माध्यमातून हातात शस्त्र घेऊन प्रतिस्पर्ध्याला थेट आवाहन देत आहेत. काही तरुणांनी तर या रीलसच्या माध्यमातून एखाद्या चित्रपटात शोभेल अशी धमकीची भाषा वापरून रीलस तयार करून ते सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसारित केलेत.

# मग शेट्टींना आम्ही कसे फसवले?, सतेज पाटील यांचे प्रत्युत्तर



**कोल्हापूर :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेतेराजू शेट्टीहेमहाविकास आघाडीसोबतयावेत, यासाठी पहिल्यापासून मी प्रयत्न केला; पण त्यांना फक्त उद्धवसेनेचीच सोबत हवी होती. दोन्ही काँग्रेससोबत येण्यास नकार दिल्याने वरिष्ठ पातळीवर समज-गैरसमज झाला. आम्ही कोणाचीही फसवणूक केली नसल्याची माहिती काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

आमदार पाटील म्हणाले,राजू शेट्टीहे आघाडीसोबत यावेत, यासाठी आग्रह धरणारा मी एकमेव होतो. त्या दृष्टीने आघाडीच्या पातळीवर चर्चाही झाली होती. आघाडीकडून एखादी जागा सोडल्यानंतर त्याच्या बदल्यात राज्यात काहीतरी भूमिका जाहीर करायला हवी, यासाठी लेखी स्वरूपात चर्चा झाली होती. बुलढाण्याबाबत त्यांना तांत्रिक अडचण होती, तरीही 'हातकणंगले'त पाठिंबा जाहीर करा, राज्य कार्यकारिणी घेऊन उर्वरित ठिकाणी आघाडीला पाठिंबा देऊ, असे शेट्टी यांनी सांगितले.

तसे घडले नाही. त्यामुळे फसवणूक आघाडीने केलेली नाही. दोघांमध्ये सुसंवाद झाला नाही, अंतिम टप्प्यात शेवटच्या दोन दिवसांत आपण स्वतः त्यांच्याशी चर्चा करून सगळ्या गोष्टी सांगितल्या. नंतर ते तयार झाले होते; पण तोपर्यंत वरिष्ठ पातळीवर समज-गैरसमज झाल्याने चर्चा फिस्कटली. विधानसभेला एकसंधपणे सामोरे जाणार

'स्वाभिमानी' आमच्यासोबत हवी, म्हणून लोकसभेला भूमिका घेतली होती. विधानसभेला आघाडी एकत्र बसून निर्णय घेईल. आघाडीत कोणाला घ्यायचे याचा निर्णय राज्यपातळीवर होईल.महाविकास आघाडीम्हणून विधानसभा एकसंधपणे लढणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# ४४ गोवंश तस्करांच्या मुसक्या आवळल्या

**अकोला :** शेतकऱ्यांचे गोधन चोरीला जात असल्याच्या घटनांची गंभीर दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या निर्देशानुसार बकरी इदच्या पृष्ठभूमिवर जिल्हाभरात छापेमारी करुन तब्बल ४४ गोवंश तस्करांना अटक करण्यात आली आहे. यादरम्यान, २० गोवंशांना जीवनदान मिळाले असून या कारवाइसाठी १७ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत तात्पुरते २७ चेक नाके उभारण्यात आले होते,हे विशेष.

पुरेसा पाऊस होताच शेतकरी वर्गात पेरणीची लगबग सुरु होते. ही बाब हेरुन गोवंश तस्कर डोके वर काढतात. शेतकऱ्यांचे गोधन चोरुन त्यांची निर्दयतेने कत्तल होत असल्याचे पाहता जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी जिल्हाभरातील पोलिस यंत्रणेला गोवंश तस्करांना हुडकून काढत त्यांना बेड्या ठोकण्याचे निर्देश दिले होते. त्यानुषंगाने १७ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत तात्पुरत्या स्वरुपाचे चेक नाके उभारण्यात आले.मागील १७ दिवसांच्या कालावधीत अवैधरित्या गोवंशाची निर्दयतेने वाहतुक करुन त्यांची कत्तल करणाऱ्या तस्करांना पकडण्याची मोहीम राबविण्यात आली. यामध्ये जिल्हाभरात ४० केसेस दाखल केल्या असून ४४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कारवाइ दरम्यान, २० गोवंशांना जीवनदान देण्यात आले. पोलिसांनी चार वाहनासह १४ लक्ष ४९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पाच महिन्यांत १०४ तस्करांना बेड्या

बच्चन सिंह यांनी १ जानेवारी रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक पदाची सुत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी पहिल्याच क्राइम मिटींगमध्ये गोवंश तस्करीला समुळ उखडून टाकण्याचे निर्देश दिले होते. मागील पाच महिन्यांच्या कालावधीत याप्रकरणी शहरासह जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांत ८५ गुन्हे दाखल करण्यात येऊन १०४ तस्करांना अटक करण्यात आली आहे. तसेच तस्करांकडून तब्बल ९६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**कारवाइला गती देण्याची सूचना**

गोधन चोरीला जात असल्याने शेतकरी वर्ग मानसिकरित्या खचून जातो. वाहनात गोवंशांना कोंबून त्यांची कत्तल करणाऱ्या तस्करांना पकडण्याच्या कारवाइला गती देण्याची सूचना जिल्हा पोलिस अधीक्षक सिंह यांनी पोलिस यंत्रणेला दिली आहे.

# सातारा जिल्हा कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या कार्यकारिणी संपर्क प्रमुख गणेश मुळीक यांची निवड

**आसनगाव :** नपटवाडी ता.कोरेगावचे पै.गणेश मुळीक यांची नुकतीच सातारा जिल्हा कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या कार्यकारणी सदस्यपदी (संपर्क प्रमुख) निवड झाली आहे. सातारा जिल्हा कुस्ती संघटनेची फेरनिवड करण्यात आली यामध्ये गणेश मुळीक यांची निवड करण्यात आली असून निवडीचा कार्यक्रम सातारा येथे नुकताच पार पडला.सदर कार्यक्रमास हिंदकेसरी संतोष वेताळ,अर्जुनवीर विजेते पै. काकासाहेब पवार ,उपमहाराष्ट्र केसरी पै.आबा सुळ,कुस्ती मल्लविद्या संस्थापक अध्यक्ष पै.गणेश बानगुडे,



**निवडीचे पत्र स्वीकारताना पै.गणेश मुळीक व उपस्थित मान्यवर (छायाः शुभम गुरव)**

सातारा जिल्हाध्यक्ष अमर साबळे उपस्थित होते. कुस्ती संघटना बळकट करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहू असे उद्गार यावेळी पै.गणेश मुळीक यांनी काढले.

# मणिपूरमध्ये केंद्र सरकार मोठी पावले उचलण्याच्या तयारीत

मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराला आता जवळपास दीड वर्षे लोटलं आहे. मात्र,अद्यापही त्या राज्यातील हिंसाचार रोखण्यात यश आलेलं नाही.त्यावेळी झालेल्या हिंसाचाराचे अनेक व्हिडिओ आतापर्यंत समोर आले आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे दोन महिलांना नग्न अवस्थेत नेलं जात असतानाच्या व्हिडीओने देशभरात खळबळ उडाली होती.या व्हिडिओचे संसदेतही पडसाद उमटलेले होते. लोकसभा निवडणुकीत देखील मणिपूरमधील हिंसाचाराच्या मुद्द्यांवरुन भाजप चांगलंच बॅकफूटला गेलं. त्यानंतर भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही नव्याने सत्तेत आलेल्या एनडीए सरकारला मणिपूरमधील हिंसाचारावरुन खडे बोल सुनावले होते. आता त्यानंतर केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये आले असून मणिपूरबाबत मोठी पावले उचलण्याच्या तयारीत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली गृहमंत्रालयात मणिपूरमधील परिस्थितीबाबत सोमवारी (ता.१७) महत्त्वाची बैठक झाली.या बैठकीला भारतीय लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे, पुढील लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी,मणिपूरचे डीजीपी राजीव सिंह,माजी सीआरपीएफ प्रमुख आणि मणिपूर सरकारचे सुरक्षा सल्लागार कुलदीप सिंह आणि इतर अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.पण या बैठकीला मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंग हजर नव्हते.

मणिपूरचे राज्यपाल अनुसुईया उईके यांनी रविवारी गृहमंत्री अमित शाह यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतल्यानंतर ही बैठक झाली. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी मणिपूर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. गेल्या वर्षी मे महिन्यापासून कुकी आणि मेईतेई या दोन समुदायांमध्ये संघर्ष सुरू आहे. मणिपूरमध्ये ३ मे २०२३ रोजी बहुसंख्य मेतेई समुदायाच्या अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या मागणीला विरोध करण्यासाठी राज्यातील डोंगराळ जिल्ह्यांमध्ये आदिवासी एकता मोर्चानंतर जातीय हिंसाचार उफाळून आला होता. आता अमित शाह या महत्त्वाच्या बैठकीनंतर केंद्र सरकार मोठं पावले उचलणार असल्याचे बोलले जात आहे. र

ाष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर तोफ डागली.मणिपूर एका वर्षांपासून जळत असल्याचे सांगत, त्यांनी याप्रकरणी सत्ताधाऱ्यांपैकी कोणीच त्या भागात गेले नसल्याचा आरोप केला. मणिपूरच्या विषयावर सरसंघचालक भागवत यांनी सरकारचे कान टोचले होते.

# उद्यापासून १९५ पोलिस शिपाइ पदासाठी भरती प्रक्रिया ; प्रशासन सज्ज असल्याची जिल्हा पोलिस अधीक्षकांची माहिती

**अकोला :** जिल्हा पोलिस दलाच्यावतीने १९ जून पासून १९५ पोलिस शिपाइ पदासाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. या पदभरतीसाठी एकूण २१ हजार ८५३ उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून यामध्ये १६ हजार १६१ पुरुष उमेदवार, ५ हजार ६९१ महिला उमेदवार तसेच तृतीयपंथी पुरु पुरुष उमेवाराची संख्या एक आहे. निमवाडीस्थित पोलिस मुख्यालयात बुधवारी सकाळी ५ वाजता पासून या प्रक्रियेला प्रारंभ केला जाणार आहे. यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी दिली.-ऊ्नएठढखडएचएछ्ढझुेशीशव लूउमेदवारांना शारिरीक तसेच कागदपत्रे पडताळणी चाचणीसाठीपोलिसमुख्यालयात बोलविल्या जाणार आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील ८०० पुरुष उमेदवारांना १९ जून व २० जून रोजी तसेच २१ व २२ जून रोजी १हजार उमेदवारांचा समावेश राहील. २४ जून ते १ जुलै या कालावधीत १हजार ५०० उमेदवारांना बोलाविण्यात येइल. २ जुलै रोजी सर्वसाधारण पुरुष प्रवर्गातील १ हजार ६२ पुरुष उमेदवार बोलावल्या जातील.

त्यानंतर ३ जुलै रोजी भुकंपग्रस्त, माजी सैनिक, अंशकालीन, तृतीयपंथी, होमगार्ड,पोलिसपाल्य, खेळाडू, प्रकल्पग्रस्त आदी प्रवर्गातील सर्व पुरुष उमेदवारांना बोलावून त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी दिली. यावेळी अपर जिल्हा पोलिस अधीक्षक अभय डोंगरे, स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख पोलिस निरीक्षक शंकर शेळके उपस्थित होते.

४ जुलै पासून महिला पदासाठी प्रक्रिया

आरक्षण प्रर्वगातील महिला उमेदवारांची चाचणी व कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया ४ जुलै पासून सुरु होइल. ४ जुलै व ५ जुलै या दोन दिवसांच्या कालावधीत १ हजार ५०० महिला उमेदवार व ६ जुलै रोजी महिला आरक्षणातील उर्वरित १ हजार ५४ महिला उमेदवार तसेच १०२ महिला भुकंपग्रस्त, माजी सैनिक, अंशकालीन, अनाथ, होमगार्ड, पोलिस पाल्य, खेळाडू, प्रकल्पग्रस्त अशा एकुण १ हजार १५६ महिला उमेदवारांना पडताळणीसाठी बोलविण्यात आले आहे. उर्वरीत १ हजार ५३५ महिला उमेदवारांची पडताळणी ८ जुलै रोजी पार पडेल.

ही पदभरती प्रक्रिया १७ दिवस चालणार आहे. रविवारी या प्रक्रियेला विराम दिला जाणार असल्याचे पोलिस अधीक्षकांनी सांगितले.

उमेदवारांना चार दिवसांची मुदत

ज्या उमेदवारांना पोलिस पदभरतीसाठी एकाच दिवशी दोन ठिकाणी किंवा लागोपाठ मैदानी चाचणी व कागदपत्रे पडताळणीसाठी तारीख देण्यात आली असेल, अशा उमेदवारांना एका ठिकाणची पडताळणी आटोपल्यानंतर दुस-या जिल्हयात जाण्यासाठी किमान ४ दिवसांच्या अंतराने पदभरतीसाठी मुदत देण्यात आली आहे. उमेदवारांना अडचण असल्यास त्यांनी ीरींपरज्ञ.ीरीषर ारहरळीं.ीस यावर ईमेल करावा, असे पोलिस अधीक्षक सिंह यांनीनमुदकेले.

